



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३१५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.२६ जून २०२५

## नाशकात पोलिसाने लेकीसह आयुष्य संपवलं, चटका लावणारं कारण समोर

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२५, नाशिक :** कौटुंबिक कलहामुळे नैराश्यात असलेल्या नाशिक शहर पोलिस कर्मचाऱ्याने स्वत:च्या सहा वर्षीय चिमुकलीचा गळफास देऊन खून केला. त्यानंतर स्वत: गळफास घेऊन आत्महत्या केली. ही हृदयद्रावक घटना नाशिकरोड भागातील जेलरोड परिसरात घडली.

स्वप्निल गायकवाड, वय ३४ वर्ष, रा. योगमळा, मॉडेल कॉलनी, असे मृत पोलिस कर्मचाऱ्याचे नाव आहे, तर मुलीचे नाव भैरवी, वय ६ वर्ष आहे. मंगळवार दि. २४ जून रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास ही घटना उघड झाली. रात्री उशिरापर्यंत पंचनामा करण्यासह गुन्हा नोंदविण्याचे काम सुरू होते.



**नेमकं काय घडलं?**
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वप्निल हा पोलिस शिपाई पदावर उपनगर पोलिस ठाण्यात कार्यरत होता. दीड वर्षापूर्वी स्वप्निलचा दुचाकी अपघात झाल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. यामुळे काही महिने तो कोमात होता. प्रकृती सुधारल्यानंतर कुटुंबात कलह सुरू झाले.

**लव्ह मॅरेज, तरी पत्नीशी सतत खटके...**
प्रेमविवाह केलेल्या स्वप्निलचे त्याच्या पत्नीसोबत सातत्याने वाद सुरू होते. त्यातूनच काही महिन्यांपासून त्याची पत्नी विभक्त राहत असल्याने सहा वर्षीय भैरवी स्वप्निलकडे वास्तव्यास होती. कौटुंबिक कलह आणि आजारपणाने त्रस्त झालेल्या स्वप्निलने नैराश्यातून भैरवीचा खून करून स्वत: आत्महत्या केल्याचा पोलिसांना संशय आहे.

या प्रकरणी पोलिस तपास करीत आहेत. या घटनेमुळे जेलरोड परिसरासह संपूर्ण पोलिस दलात खळबळ उडाली असून, वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह परिसरातील रहिवाशांनी हळहळ व्यक्त केली.

**जुन्या हत्या प्रकरणाच्या आठवणी ताज्या...**
एप्रिल महिन्यात नाशिक रोड पोलिसांच्या हद्दीत याच स्वरूपाचा गुन्हा घडला होता. मुरलीधर जोशी नावाच्या एका निवृत्त प्राध्यापकाने पत्नीचा गळा दाबून खून केल्यानंतर स्वत:ही गळफास घेत आत्महत्या केली होती. जोशी दाम्पत्यदेखील जेलरोड भागात राहत होते.

पत्नी आजारी असल्याने जोशींनी हे कृत्य केले होते. त्यांनी आत्महत्येपूर्वी एक चिठ्ठी लिहून पत्नीवरील प्रेम आणि आजारामुळे दोघांनाही मुक्त करीत असल्याचे नमूद केले होते.

## शाळाखोल्या इमारत बांधकामासाठी ९६ लक्ष निधी मंजूर

**● आमदार काशिनाथ दाते यांची माहिती**

१. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंभारवाडी (पारनेर) १ खोली,
२. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करंदी १ खोली
३. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवीभोयरे १ खोली
४. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढगेवाडी, पळसपुर १ खोली
५. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रेनवडी १ खोली
६. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जवळा, गावठाण १ खोली,
७. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हमालवाडी, कुरुंद १ खोली
८. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोंद्रे १ खोली

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील ग्रामीण भागातील विध्यार्थ्यांना आधुनिक व सुरक्षित शिक्षण सुविधा मिळवून देण्याच्या प्रमुख उद्देशाने जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इमारत बांधकामांसाठी ८ शाळाखोल्यांना ९६ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती आमदार काशिनाथ दाते यांनी दिली.



आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले की,लोकशाही व्यवस्थेत आजवर मिळालेल्या पदांच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात भक्कम व पायाभूत सुविधा निर्माण करण्यास सातत्याने प्राधान्य दिले असल्याचे पारनेर-नगर मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सांगितले.

शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठीच्या या सकारात्मक निर्णयामुळे तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आता आधुनिक, सुरक्षित आणि दर्जेदार शिक्षण सुविधा उपलब्ध होणार आहेत. तालुक्यातील कुंभारवाडी (पारनेर), करंदी, देवीभोयरे, हमालवाडी (कुरुंद), ढगेवाडी (पळसपूर), जवळे (गावठाण), रेनवडी आणि भोंद्रे या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळांना प्रत्येकी एका खोलीसाठी १२ लक्ष रुपये निधी उपलब्ध होणार आहे. मागील तीन ते चार महिन्यांपूर्वी तालुक्यातील ज्या २० नवीन शाळाखोल्यांच्या इमारत बांधकामासाठी दोन कोटी चाळीस लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला असुन त्यांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरवात होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. डोंगरी विकास योजनेंतर्गत तालुक्यातील डोंगरी भागातील १४ शाळानाही शाळा डिजिटल करण्यासाठी ३७.८० लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आलेला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी उच्च दर्जाचे शिक्षण घेत असताना त्यांना भक्कम आणि सुरक्षित पायाभूत सुविधा लाभाव्यात, यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकासाचे दार खुले करण्यासाठी हा निर्णय मोलाचा ठरणार असून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचेही याकामी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले असल्याचे त्यांनी सांगितले. शाळा विकास व व्यवस्थापन समित्या, ग्रामस्थ आणि पालक वर्गाकडून या निर्णयाचे निश्चितच स्वागत होणार असून ग्रामीण भागातील शिक्षणाला चालना मिळणार असल्याचा विश्वास निर्माण होण्यास मदत होईल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## पुणेकरांसाठी आनंदाची बातमी!

### ८० किलोमीटरपर्यंत मेट्रोचं जाळं, कुठून-कुठे असेल मार्ग?

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२५, पुणे :** पुणे मेट्रो प्रकल्पाच्या वनाझ ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली-विठ्ठलवाडी या विस्तारित मार्गांना बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या दोन्ही मार्गांसाठी ३ हजार ६०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून पुढील चार वर्षांत हे काम पूर्ण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडे (महामेट्रो) देण्यात आली आहे.



**पुणे मेट्रो प्रकल्पाच्या मार्गिकांचं विस्तार...**
पुणे मेट्रो प्रकल्पाच्या पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट (पर्पल लाइन) मार्गिकेचा विस्तार अनुक्रमे निगडी व कात्रजपर्यंत करण्यासाठी यापूर्वीच मान्यता देण्यात आली आहे. वनाझ ते रामवाडी दरम्यानच्या मार्गिकांचा प्रस्ताव एक वर्षाहून अधिक काळ केंद्र सरकारच्या मान्यतेसाठी प्रलंबित होता. अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या विस्तारित मार्गांवर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यामुळे पुढील काही दिवसांत या दोन्ही मार्गिकांचे काम सुरू होण्याची अपेक्षा आहे.

**पुणेकरांसाठी मेट्रोची सुविधा...**
पुणे-अहिल्यानगर रस्त्यावर सध्या मेट्रोची सेवा केवळ रामवाडीपर्यंत असून त्यापुढे शहर वाघोलीपर्यंत विस्तारले आहे. त्यामुळे या परिसरातून येणाऱ्या नागरिकांना रामवाडीच्या पुढे रिक्षा किंवा खासगी कॅबवर अवलंबून राहावे लागत होते. रामवाडीचा विस्तार लवकरात लवकर वाघोलीपर्यंत करण्याची मागणी सातत्याने केली जात होती.

**मेट्रोचे जाळे ८० किमीपर्यंत विस्तारणार...**
अखेर, प्रवाशांच्या या मागणीला यश मिळाले आहे. त्याशिवाय, मुंबई किंवा सातारा येथून राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) अथवा खासगी प्रवासी वाहनांनी येणाऱ्या नागरिकांना चांदणी चौकापासून मेट्रो मिळाली, तर त्यांना शहराच्या सर्व भागांत ये-जा करणे शक्य होणार आहे. त्यासाठी या विस्तारित मार्गाची गरज व्यक्त केली जात होती. या दोन्ही मार्गांना मान्यता दिली गेल्याने पुणे शहरातील एकूण मेट्रोचे जाळे ८० किमीपर्यंत विस्तारणार आहे.

दरम्यान, मेट्रोसह रिंग रोडशिवाय पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात आहे. यावर पुणे रिंग रोड प्रकल्पाला गती देणं हा कायमस्वरूपी उपाय आहे. त्यासाठी समांतर लोहमार्ग बांधण्याची गरज आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

## थोडक्यात

### सुपा पोलिसांची कार्यवाही ! लाखो रुपयांचा गुटखा पकडला

**अक्षराज : राजकुमार इकडे**
**दि.२५, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील सुपा पोलिस स्टेशनला दि.२३ जुनला गुप्त बातमीदारांमार्फत खबर मिळाली,की अहिल्यानगर ते पुणे रोडने टाटा कंपनीची मालट्रक मधुन अवैद्य मालाची वाहतुक करुन घेउन जात आहे. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सुपा पो.स्टेशनचे स.पो.नि.सोमनाथ दिवटे, पो.कॉ.ढाकणे, पो.हे.कॉ.धामणे, ठाणे आमलदार बर्डे, पो.कॉ.दरेकर असे पोलिस पथक मध्यरात्रीच्या १ वाजता नगर-पुणे हायवे रोडवरील सुपा कार्यक्षेत्रातील पवारवाडी घाटाच्या पुढे नाकाबंदी करण्यात आली. पहाटे ३च्या सुमारास अवैद्य वाहातुक करणारा टाटा कंपनीचा मालट्रक अहिल्यानगरच्या बाजुने येतांना दिसला. त्याक्षणी पोलिस पथकाने हात दाखवुन गाडी थांबवण्याचा प्रयत्न केला. गाडी पण थांबली. ट्रकचालक ही खाली उतरला, कागदपत्राची मागणी केली असता, कागदपत्रे देतो असे सांगुन गाडीच्या बाजुने अंधाराचा फायदा घेउन चालक फरार झाला. पोलिस पथकाने मध्यरात्रीचा शोध घेतला पण ट्रकचालक मिळुन आला नाही,



पोलिस पथकाने सदर ट्रक ताब्यात घेतला. गाडी तपासनीसाठी दुसरे दिवशी अन्न सुरक्षाधिकारी प्रदीप पवार व सरकारी पंच म.पो.सई एम.एच.जेजोट यांनी तपासनी केली असता सदर मालट्रकमधे प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु असल्याचे स्पष्ट झाले. त्याची बाजारभावाप्रमाणे किंमत ११,०२,५०० रुपये आहे. सदरची कार्यवाही ही सोमनाथ घार्गे सोमा.पो.अधिक्षक अहिल्यानगर, प्रशांत खैरे अप्पर पोलिस अधिक्षक अहिल्यानगर, अमोल भारती उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलिस निरीक्षक सुपा पोलिस स्टेशनचे सोमनाथ दिवटे, म.पो.सई एम.एच जेजोट, पो.हे.कॉ.अमोल धामणे, अशोक मरकड, पो.कॉ.विकास गायकवाड, रमेश दरेकर, तारांचंद जाधव, योगेश सातपुते, राहुल ढाकणे या सर्व पोलिस टिमचे सर्व स्तरातुन कोतुक होत आहे.

### बच्चू कडूंना मोठा दिलासा, जिल्हा बँक अध्यक्षपदावर नागपूर हायकोर्टानं दिला महत्त्वाचा निर्णय

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२५, नागपूर :** माजी राज्यमंत्री तथा 'प्रहार'चे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाच्या अपात्रता निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे. या निर्णयाने बच्चू कडू यांचे जिल्हा बँकेचे अध्यक्षपद कायम राहणार आहे. त्यांना १६ जून रोजी अपात्र ठरविण्यात आले होते.



**नेमकं प्रकरण काय?**
बच्चू कडू यांच्याविरुद्ध २०१७मध्ये नाशिक येथील एका आंदोलनप्रकरणात सुकरवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. शासकीय कामात अडथळा आणि मारहाण केल्यावरून न्यायालयाने त्यांना एक वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नियमानुसार, बँकेच्या संचालकाला न्यायालयाने एक वर्षापर्यंतची शिक्षा सुनावल्यास त्याला पदावर राहता येत नाही. हीच बाब पुढे करीत बँकेच्या विरोधी गटातील बारा संचालकांनी हरिभाऊ मोहोड यांच्या नेतृत्वाखाली बच्चू कडू यांना अपात्र ठरविण्याची मागणी केली होती.

सहकार विभागाचे विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी या तक्रारीची दखल घेत बच्चू कडू यांना नोटीस बजावली होती. यानंतर २४ फेब्रुवारी रोजी बच्चू कडू यांना त्यांचे म्हणणे मांडण्यास सांगण्यात आले होते. याआधारे सहनिबंधकांनी त्यांना अपात्र ठरविण्याचा निर्णय घेतला होता. शिवाय त्यांना पाच वर्षांपर्यंत बँकेची कोणतीही निवडणूक लढता येणार नव्हती. याविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात बच्चू कडू यांनी आव्हान दिले होते. यावर मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सुनावणी झाली. न्यायालयाने विभागीय सहनिबंधकांच्या आदेशाला स्थगिती दिल्याने बच्चू कडू यांना दिलासा मिळाला आहे.

### 3 नराधमांचा अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**दि.२५, धाराशिव :** मुल, मुली एकमेकावर प्रेम करतात, आणाभाका घेतात. लग्नाचे स्वप्न पाहतात.सुखी संसाराची स्वप्न पाहतात. आणि एकमेकात समरुप होतात. मुली मुलावर विश्वास ठेवतात.आणि कुठल्या ही संकटाला सामोरे जाण्यास तयार होतात. असच संकट धाराशिव जिल्हयातील कळंब तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन आले.ज्याच्यावर प्रेम केल त्या जोडीदाराने त्यांच्या मित्रांच्या हवाली प्रियसीला केल. तिघांनी मिळुन त्या अल्पवयीन मुलीवर सामुहिक अत्याचार केलाय. तक्रारदार मुलीची ओळख झाली ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. लग्नाचे आमिष दाखवत मुलांने मुलीवर वारंवार अत्याचार केले.१६ जुन रोजी मुलीचे वडिल शेताकडे गेले होते. घरी आई,बहिण,भाऊ होते. रात्री १२ वाजता दरवाजा वाजला मुलीला वाटले वडिल आले म्हणुन दरवाजा उघडला तर समोर तो मुलगा होता. तु माझ्या बरोबर चल आपल्याला आपल्या लग्ना बद्दल बोलायचे आहे.असे म्हणुन मुलीला घेवुन गेला.सोबत मित्र होताच. जवळे दुमाला रोडवरील पत्र्यांच्या शेडवर मुलीला घेवुन गेले. तेथे तिसरा मित्र अगोदरच आला होता. पत्र्याच्या शेड मध्ये गेल्यानंतर मुलीने मुलास म्हटले लग्ना बद्दल लवकर बोल मला लवकर घरी जायचय घरचे उठतील, मला नेऊन सोड असे म्हणताच मुलाने बळजबरीने शाररिक संबध ठेवले.नंतर माझ्या मित्रांना देखील शाररिक संबध ठेवु दे असे म्हणताच मुलीने विरोध केला. मी बापाचे ऐकत नाही, पण मित्रांचे ऐकतो,माझ्या मित्रांना शाररिक संबध ठेवु दे नाही तर तुझ्या वडिलांना,चुलत्यांना जिवंत मारुन टाकिन अशी धमकी देत तिघांनी या मुलीवर सामुहिक अत्याचार केला. गावात कोणाला सांगितलेस तर घरच्यांना जिवंत मारुन टाकिन अशी धमकी दिली नंतर घरी आणुन सोडले.

# संपादकीय



## बिहारच्या रणधुमाळीतील 'दो लडके'!

गेल्या पाच दशकांत गंगेच्या काठावर बिहारच्या राजकारणात अनेक चढ-उतार आले, परंतु १९७०पासून विद्यार्थी संघटना व नंतर मुख्य प्रवाहाचं राजकारण करणारे लालूप्रसाद यादव आणि त्यांना थोडेसे ज्युनिअर असलेले नितीशकुमार हेच बिहारचा दिल्लीतला चेहरा राहिले आहेत.

जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनातूनच दोघेही पुढे आले. दोघांनीही बिहारच्या सत्तेत केवळ निर्णायक भूमिका बजावली नाही, तर राष्ट्रीय पातळीवरही आपले प्यादे सतत मजबूत केले. भिन्न विचारसरणी असली तरी बिहारच्या राजकारणात या दोघांची भूमिका, त्यांच्यातला संघर्ष, स्पर्धा आणि युतीची कहाणी अद्भुत आहे. मुख्यमंत्री ते केंद्रात रेल्वेमंत्री अशी साम्यस्थळेही दोघांच्या प्रवासात आहेत. या दोन्ही नेत्यांनी अर्धशतकभर कायम ठेवलेल्या वर्चस्वाने बिहारलाही वेगळी दिशा दिली. लालूंनी सामाजिक न्यायाचा झेंडा उंचावला, तर नितीश कुमार यांनी प्रशासकीय सुधारणा सुरू ठेवल्या. मार्च २०००मध्ये फक्त सात दिवसांसाठी मुख्यमंत्री झालेल्या नितीश कुमार यांनी नंतर ते पद घट्ट पकडून ठेवले ते आजतागायत. गेली काही वर्षे नितीशकुमार यांच्या मानसिक-शारीरिक आरोग्याच्या तक्रारींची चर्चा आहे व त्यात तथ्यही आहे. त्यांचे अनेक कार्यक्रम पुढे ढकलले जात आहेत आणि त्यांच्या आरोग्यामुळे त्यांची निवडणूक प्रचारातील भूमिकाही मर्यादित राहण्याची शक्यता आहे.

मात्र, नितीशकुमार कोणाबरोबरही गेले तरी त्यांच्या प्रशासन कौशल्यामुळे व प्रतिमेमुळे बिहारची जनता त्यांच्याच पारड्यात माप टाकते, हा इतिहास आहे. त्यामुळे प्रकृती कितीही ढासळलेली असली तरी भाजपचे केंद्रीय नेतृत्व सम्राट चौधरी आदींपेक्षा आघाडीचा चेहरा नितीशकुमार हाच ठेवणार, हे उघड आहे. केंद्रात सरकार असल्याचा राज्याला होणारा लाभ, बिहारमधील जातीय समीकरणं, विकासाच्या मुद्द्यांवर भर आणि विरोधी पक्षांना होता होईल त्या मार्गानं कमकुवत करणं ही भाजपची चतु:सूत्री बिहारमध्येही कायम राहणार असली तरी नितीशकुमार यांचा हात सोडणं भाजपला परवडणारं नाही. बिहारच्या निवडणुकीचा प्रचार तापू लागेल तोपर्यंत भाजपला नवे राष्ट्रीय अध्यक्षही मिळण्याची शक्यता आहे व त्या अध्यक्षांचीही बिहार ही पहिली लिटमस टेस्ट असेल.

'यह चुनाव अब दो लड़कों की कहानी बन गया है। दोनों ही विफलता का प्रतीक हैं। एक अपनी पार्टी को डुबो रहा है, दूसरा अपनी सरकार को।' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आठ वर्षांपूर्वीच्या उत्तर प्रदेश निवडणूक प्रचारातलं हे गाजलेलं वाक्य बिहारच्या रणधुमाळीमुळेच पुन्हा आठवतं. कारण लालूप्रसाद यादव आणि नितीशकुमार या दोघांचीही प्रकृती तोळामासा आहे. भाजपचे सुशीलकुमार मोदी अकाली निघून गेले. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीची मदार बव्हंशी नव्या नेतृत्वाकडे राहणार आहे. म्हणजेच यंदाच्या निवडणुकीनंतर बिहारचा राजकीय पट त्याच त्या जुन्या चेहऱ्यांपेक्षा बदललेला असेल, अशी चिन्हं आहेत. त्यातही मुख्यमंत्रिपदाची जबर महत्त्वाकांक्षा असलेले लालूपुत्र तेजस्वी यादव आणि दिवंगत रामविलास पासवान यांचे लाडके दिपू म्हणजेच चिराग पासवान या दोन तरुण चेहऱ्यांची सर्वाधिक चर्चा सध्या आहे. विशेषतः स्वपक्षातील नेत्यांबाबतीत भाजपला अगदीच नकोशा असलेल्या घराणेशाहीचे हे दोघेही ठसठशीत प्रतीक. पासवान यांनी या आपल्या लाडक्या लेकासाठी 'मिले ना मिले हम' हा चित्रपट काढला. त्यात चिराग यांची नायिका होत्या कंगना रनौट. तो आपटल्यावर चिराग यांना वडिलांच्या राजकारणात उतरण्यावाचून गत्यंतर नव्हते. नंतर पासवान घराण्यातील नेतृत्वाची स्पर्धा भाजप नेतृत्वाच्या मदतीने जिंकणारे चिराग यांनी दिल्लीतही बरेच दिवे लावले आहेत. दिल्लीत '१० जनपथ'च्या बरोबर मागे असलेला रामविलास पासवान यांचा जनपथावरील सरकारी बंगला त्यांच्या निधनानंतर कायमस्वरूपी आपल्याकडेच ठेवण्याचा घाट चिराग यांनी घातला; पण भाजप नेतृत्वाने पासवान यांच्या पुतळ्यासह तो वेळीच उधळून लावला होता. २०१४ नंतर चिराग दिल्लीत कोणाचे 'हिज मास्टर्स व्हॉइस' आहेत हे जगजाहीर असले तरी बिहारच्या निवडणुकीच्या तोंडावर त्यांचे सूर बदलले किंवा बदलण्यात आले आहेत! नितीशकुमार यांचा चेहरा ही निवडणूक जिंकण्यासाठीची अपरिहार्यता भाजपसाठी आहे. चिराग यांच्यासाठी ती नाही, हे भाजप नेतृत्व जाणते. आपल्या लोकजनशक्ती पक्षाला भाजप ७० जागा देणार नसल्याची खात्री असल्याने कदाचित चिराग तिसऱ्या आघाडीची भाषा बोलू लागले आहेत.

# छ. शाहू महाराजांची जयंती सणाप्रमाणे साजरी करा!

'२६ जून हा शाहू महाराजांचा वाढदिवस. हा वाढदिवस अस्पृश्य समाजाने सणाप्रमाणे सर्वत्र साजरा करावा', असा ठराव बाबासाहेबांच्या प्रेरणेने मानगाव परिषदेत केला होता. नागपूर परिषदेतही तसाच ठराव केला गेला होता. आज छ. शाहू महाराजांची जयंती आहे ; अर्थातच त्यांची जयंती बहुजन समाजाने एक सन म्हणून साजरी केली पाहिजे.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा मागोवा घेताना त्यांचे मन 'उत्क्रमणशील' होते, तसेच ते 'उत्कर्षशील' होते असे म्हटले होते. असे म्हणण्यामागे फार मोठा आधार आहे. सुरुवातीस महाराजांचे मन परंपरानिष्ठ होते, कारण ते राजवाड्यातील परंपरानिष्ठ वातावरणात व तशाच प्रकारच्या अवतीभवतीच्या समाजात वावरत होते. पुढे महाराजांनी अस्पृश्यता व जातीभेद या दोन अनिष्ट सामाजिक रूढी विरुद्ध मोठा संघर्ष केला. वेदोक्त्याच्या संघर्षात वर्ण वर्चस्व वाद्यांचे दाहक चटके शाहू महाराजांना बसले होते. मराठ्यांच्या राजाला 'शूद्र' म्हणून त्याच्याच राज्यातील वरिष्ठ वर्गातील प्रजाजनांनी हिणवले होते. या विरुद्ध महाराजांनी अभुत्वपूर्व लढा दिला होता. 'वाईटातून चांगले' या न्यायाने वर्ण वर्चस्ववाद्यांच्या विरुद्ध लढण्याची महाराजांची मनोभूमिका अधिक खंबीर व तत्वनिष्ठ बनली.

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील सर्वच मागासलेल्या जातींचा उद्धार शिक्षणाच्या साधनाने करण्याचे धोरण अवलंबले होते. यासाठी १९०८ मध्ये त्यांचे सहकारी भास्करराव जाधव, महादेव डोंगरे, बागल, शिंदे आदी निकटवर्ती मंडळींनी 'अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्या प्रसारक मंडळी' नावाची संस्था स्थापन केली. या वस्तीगृहास अस्पृश्यांची मुले मिळवण्यापासून ते या मुलांचा शैक्षणिक दर्जा स्पृश्य शाळेतील मुलांच्या दर्जा इतका आणण्यापर्यंत सर्व प्रकारचे प्रयत्न ही मंडळी करत होती. शाहू महाराजांनी २४ नोव्हेंबर १९११ रोजी एक महत्वपूर्ण आदेश काढला.या आदेशान्वये संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गात सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. अस्पृश्यातील हुशार विद्यार्थ्यांना दरबाराकडून वेळोवेळी खास शिष्यवृत्या दिल्या जाऊ लागल्या. पुढे १९१९ रोजी महाराजांनी संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद केल्या सर्व जातीच्या व धर्माच्या मुलास एकत्र सरकारी शाळात बसवण्यात यावे असा आदेश काढला.

दलित पतीतांची सेवा हीच खरी मानवतेची सेवा या थोर मानवतावादी भूमिकेवर महाराज पुढील काळात आले होते. ३ ऑगस्ट १९१८ ला कोल्हापूर गॅझेट मधून प्रसिद्ध झालेल्या आदेशामुळे अस्पृश्यावर लादलेली अमानुष अशा 'हजेरी' च्या पद्धतीचे निर्मूलन करण्यात आले. हजेरी प्रमाणेच अस्पृश्य समाजाच्या माथ्यावर




'वेठवराळा' ही अमानुष पद्धत लादली गेली होती. माणगाव परिषदेनंतर अवघ्या महिन्याभरानेच शाहू महाराजांनी संस्थानातील अन्यायी वेठवराळा पद्धत कायद्याने बंद केली. पुढील काळात गावात अस्पृश्य लोकांकडून फुकट वेठ वरळेच्या स्वरूपात काम करून घेणाऱ्यास जबर शासन करण्यात येणार होते.

शाहू महाराजांनी महसूल, न्याय, धर्मार्थ दवाखाने, शिक्षण खाते, तसेच सार्वजनिक इमारती,धर्मशाळा,रेस्ट हाऊसेस, सरकारी अन्नछत्रे, वगैरे ठिकाणी व नदीचे पानवठे , सार्वजनिक विहिरी येथे कोणत्याही मनुष्य प्राण्याचा विटाळ मानण्याचा नाही, असा अस्पृश्यता निवारण्याचा जाहीरनामा काढला. अशाप्रकारे जाहीरनाम्यानची अस्त्रे समाजाच्या दृष्ट रूढींच्या बुरुजावर फेकून ते उध्वस्त करण्याचे पाऊल महाराजांनी उचलले होते.

महाराजांनी संस्थानातील कुलकर्णी वतन खालसा करून कुलकर्णी ऐवजी ब्रिटिश मुलखातील पद्धतीप्रमाणे 'तलाठी' नेमण्याची पद्धत स्वीकारली होती. तलाठ्याच्या जागेवर मागासलेल्या वर्गातील विशेषतः अस्पृश्यातील लोकांची वर्णी लागावी यासाठी तलाठी वर्ग सुरू करून त्यांना विशेष शिष्यवृत्ती देऊन प्रशिक्षित केले गेले. त्यासाठी महाराजांनी खास हुकूम जारी केले होते. मुलकी खात्यात 'दप्तर बंद' म्हणून तर पोलीस खात्यात 'पोलीस' म्हणून देखील मोठ्या प्रमाणात अस्पृश्यांच्या नेमणुका केल्या गेल्या. १९२०साली शहरातील पोलीस गेटवर १६ अस्पृश्यांच्या नेमणुका केल्या गेल्या. त्यावेळी महाराज म्हटले होते की, 'या लोकांचा समाजात दर्जा वाढावा, म्हणून आपण हे करत आहोत.'

अस्पृश्य समाजातील पैलवानांना हाक मारताना त्यांच्या जातीचा उल्लेख होत असे. त्यामुळे त्यांच्याशी इतर जातीतील पैलवान कुस्ती खेळण्यास पुढे येत नसत. यासाठी महाराजांनी अस्पृश्य पैलवानांना जाट, सरदार, पंडित असी नावे दिली.

१९२४ साली मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळात अस्पृश्याचा पहिला प्रतिनिधी म्हणून निवडून जाण्याचे भाग्य ज्ञानदेव घोलप यांना मिळाले. त्यांच्या शिक्षणाची सर्व व्यवस्था शाहू महाराजांनी केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सार्वजनिक जीवनातील त्यांच्या पहिल्या काही सहकार्यांपैकी ज्ञानदेव घोलप ह एक होते. कृष्णाजी मोरे भारतीय लोकसभेत दोन वेळा खासदार म्हणून निवडून गेले. त्यांचे शिक्षण आर्य समाजाच्या आश्रम शाळेत महाराजांच्या हुकमावरून झाले होते. गंगाराम कांबळे ची कथा तर इतिहास प्रसिद्ध आहे.महाराजांच्या दरबारात सेवेत असणाऱ्या गंगाराम कांबळेला शिवता शिव झाली म्हणून मारहाण करण्यात आली होती. महाराजांनी मारहाण करणाऱ्यांना शिक्षा दिली व गंगाराम कांबळेला कोल्हापुरातील हमरस्त्यावर हॉटेल काढण्यास प्रोत्साहन दिले. गंगाराम कांबळे यांच्या जीवनात शाहू महाराजांनी क्रांती केली. गंगाराम कांबळे पुढे अस्पृश्य समाजाचे प्रतिष्ठित पुढारी होऊन अस्पृश्य उद्धाराच्या कार्यात महाराजांचे कार्यकर्ते बनले. याच गंगाराम कांबळे यांनी महाराजांच्या पश्चात कोल्हापुरातीलच नव्हे तर अखिल हिंदुस्थानातील महाराजांचे पहिले स्मारक उभा केले.

अस्पृश्य मुक्तीच्या चळवळीत अस्पृश्य समाजाने वरिष्ठ वर्गाच्या पुढार्यांचे नेतृत्व न स्वीकारता आपल्याच वर्गाचा पुढारी करावा व स्वावलंबनाचे तत्व आचरून आपली उन्नती करून घ्यावी,हा विचार शाहू महाराजांनी वेळोवेळी मांडला होता.

**जो दुसऱ्या वरी विश्वासला ।**
**त्याचा कार्यभाग बुडाला ।**
**जो आपणच कष्टत गेला ।**
**तोचि जाण भला ।।**

हा दृष्टिकोन महाराजांनी बहुजन समाजातील केवळ अस्पृश्यांनाच नव्हे तर सर्वच जातींना दिला आहे.

धनंजय किरांनी म्हटले आहे की, शाहूंच्या या अलौकिक प्रेमामुळे व निष्ठेमुळे त्यांना मागासवर्गीय व अस्पृश्य मानलेले वर्ग देवासमान मानीत होते. गौतम बुद्ध,म. फुले व आंबेडकर यांना ते जसे पूजनीय मानीत तसेच शाहूंना ते आपला उद्धारकर्ता म्हणून पूजनीय मानीत!

अक्काजी गवई यांनी 'बहिष्कृत भारता' त लिहलेल्या शाहू महाराजांच्या मृत्यूलेखात महाराजांच्या अस्पृश्यता निवारण कार्याचा गौरव करताना त्यांना 'आमचा अब्रहम लिंकन' असे संबोधले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाराजांच्या अस्पृश्यद्धाराच्या कार्याविषयी मोठ्या कृतज्ञतेचे उद्गार काढलेले आहेत की,'शाहू महाराजांसारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता व पुढे लाभेल की नाही याबद्दल आम्हास शंका आहे.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हिंदुस्थानात प्रगती करत असलेल्या सामाजिक लोकशाहीच्या महान चळवळीचे शाहू महाराज एक आधारस्तंभ वाटत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'छत्रपती शाहू महाराजांचा वाढदिवस हा सणाप्रमाणे साजरा करा' असे आव्हान केले होते. म्हणून आमच्यासाठी छत्रपती शाहू महाराजांची जयंती हा एक मोठा सणच आहे!

**- किशोर जाधव, सोलापूर**
**मो. नं. ९९२२८८२५४१**

## आडवे..

असो प्रकल्प काही
पडावे चला आडवे
उगाचं नको उशीर
प्रारंभापासून अडवे

कशासकरे अभ्यास
विरोधक उभे कडवे
हे जनहिता विरूद्ध
तेचं तेचं गावे कडवे

भू संपादनार्थ येतात
थट्टात मस्करी उडवे
अडथळे जागोजागी
प्रसंगी कायदा तुडवे

आंदोलने न् उपोषणे
ग्रामस्थांना का नडवे
आवआण जनसेवेचा
आपले भविष्य घडवे

प्रकल्प हा फायद्याचा
हे सत्य मनोमन दडवे
जनता कैवारी आम्ही
बाकीचे बाजार बुडवे

सरकार अन् ग्रामस्थां
एकमेकांत का लढवे
गुंतागुंत. वाढत राहते
अचूकयुक्त्यात लडवे

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज !

आज २६ जून, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती. आजच्याच दिवशी १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतून बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. जयंतीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
**हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.**
**या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत.** Email : newsaksharaj2021@gmail.com **संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२**

## थोडक्यात

### दै. अक्षराज पत्रकार विनोद गिरी यांच्या पाठपुराव्याला यश




**अक्षराज : विनोद गिरी**


**दि.२४, डोंबिवली :** पांडुरंग वाडी मॉडेल इंग्लिश स्कूल रोड, आशा पार्क समोर, डॉक्टर गुरुराज कोडीयाल क्लिनिक आणि लक्ष्मी अॅल्युमिनियम यांच्या समोर तसेच शाळेच्या गेट समोर असलेले दोन स्पीड ब्रेकर रात्रीच्या वेळी झाडांच्या सावलीमुळे दिसत नसल्यामुळे किरकोळ अपघाताचे प्रमाण वाढले होते. विशेषतः महिला, वयस्कर नागरिक आणि नवोदित दुचाकी चालक यांना यामुळे अडचणींचा सामना करावा लागत होता.

या समस्येबाबत दैनिक अक्षराजचे पत्रकार विनोद गिरी यांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तत्काळ संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून नागरिकांच्या समस्येची माहिती दिली. त्यांच्या पाठपुराव्यामुळे केडीएमसीकडून त्वरीत कारवाई करण्यात आली आणि दोन्ही स्पीड ब्रेकरवर पांढऱ्या पट्ट्यांची रंगसफेदी करून ती दिसणारी करण्यात आली.

या कार्यामुळे आता रात्रीच्या वेळी वाहनचालकांना स्पीड ब्रेकर सहज लक्षात येतील, ज्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. परिसरातील नागरिक, मॉडेल इंग्लिश शाळेतील विद्यार्थी आणि पालक वर्गाने पत्रकार विनोद गिरी यांचे मन:पूर्वक आभार मानले.

तसेच, या उपक्रमात सहकार्य करणाऱ्या केडीएमसीच्या अधिकाऱ्यांचे आणि गिरी यांच्यासोबत काम करणाऱ्या त्यांच्या मित्रपरिवाराचेही स्थानिक रहिवाशांकडून विशेष आभार मानले गेले आहेत.

### नमुंमपा मालमत्ताकर बिले सदोष...



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 | 407 | 407 | 814 |
| 0 | 0 | 0 | 0 | 50 | 50 | 100 |
| 0 | 0 | 0 | 0 | 88 | 88 | 176 |
| 0 | 0 | 0 | 0 | 25 | 25 | 50 |
| 0 | 0 | 0 | 0 | 50 | 50 | 100 |
| 0 | 0 | 0 | 0 | 7 | 7 | 14 |
| 0 | 0 | 0 | 0 | 42 | 42 | 84 |
| 0 | 0 | 0 | 0 | 100 | 100 | 200 |
| 0 | 0 | 0 | 0 | 25 | 25 | 50 |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | 0 | 0 | | 794 | 794 | 1588 |

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२५, जुईनगर (नवी मुंबई) :** महानगरपालिकेने या महिन्यात मालमत्ता कराची नव्या पद्धतीची बिले पाठवलेली आहेत. सदर बिले ही सदोष असल्याचे निदर्शनास आले असून या बिलांना पाहून ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे, त्यामुळे ग्राहक वैतागलेले असून त्यांनी याविषयी संतप्त प्रतिक्रिया दिलेल्या आहेत.

**नागरिकांना संभ्रमात टाकणाऱ्या काही बाबींचा आपण येथे नागरिकांच्या सांगण्यानुसार परामर्श घेणार आहोत...**

महानगरपालिकेला जुन्या बिलांचे फॉरमॅट नव्या पद्धतीने करण्याची गरज का भासली?

इतकी वर्षे जी प्रणाली चालत होती त्यात अचानक बदल करण्याची गरज होती का?

बिलांचे फॉरमॅट बदलणे म्हणजे नवीन संगणकीय प्रणाली विकसित करावी लागली असेल व त्यासाठी लाखो रुपयांचा खर्च झाला असेल.

जुने मालमत्ता कराचे बिल सुबक होते. ते वाचनास सोपे होते. नवीन बिलाचा फॉन्ट जुन्या बिलाच्या मानाने फारच छोटा असून तो वयस्कर लोकांना वाचणे कठीण जात आहे.

अनिवासी रकान्यात कराचे दर शून्य दाखवले असून त्याची रक्कम मात्र दाखविलेली आहे ते कसे? त्यामुळे करदात्याला रेट संदर्भात स्पष्टता येत नाही.

करनिर्धारण दिनांक जो दाखवला आहे, तो मागच्या वेळच्या नोंदी नुसार चुकीचा छापला आहे.

बिल भरताना ६ महिन्याचे भरावे का एका वर्षाचे भरावे याची स्पष्टता नाही.

बिलाचे फॉरमॅट जरी आधुनिक वाटत असले तरी पालिकेची वेबसाईट नीट चालेल का?

नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी सदर नवीन बिलाच्या फॉरमॅट करिता जी घाई केलेली आहे किंवा जो खर्च केलेला आहे त्याची खरोखरच गरज होती का?

असे काही प्रश्न नागरिकांनी उपस्थित केलेले आहेत. वारेमाप अनावश्यक खर्च केल्यामुळे आयुक्तांच्या मनात आगाऊ पैसे गोळा करून ते संपवण्याची नामी युक्ती सुचल्याचे बोलले जात आहे. पालिकेच्या उधळपट्टीने तिजोरी रिकामी झाली असेल तर त्याची शिक्षा करदात्यांना का? एका वेळेस दुप्पट बिल भरण्याची नामुष्की ओढवली आहे. नागरिकांनी दुप्पट बिल का भरावा? नागरिक सदर दुप्पट बिल भरतील का याचा विचार अधिकाऱ्याने केलेला दिसत नाही. कोणत्याही सेवेचे बिल सेवा न देता आधी पैसे वसूल करण्याची नामी शक्कल हाणून पडण्याची गरज असल्याचे जुईनगर सेक्टर २३ येथील सामाजिक कार्यकर्ते श्रीधर मढवी यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना म्हटले आहे.

### अंबरनाथ येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व ज्येष्ठांना छत्री वाटप



**अक्षराज : मोहन पोळ**

**दि.२५, अंबरनाथ (ठाणे) :** शिवसेना वर्धापन दिनाचे औचित्य साधून, शिवसेना शहर प्रमुख अरविंद वाळेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या चला शिकू, व शिक्षण शिकवूया आणि बलशाली भारत घडवूया असा नारा देत, उदात्त हेतूने सर्व सन्माननीय शिवसैनिक यांच्या वतीने नुकतेच अंबरनाथ येथील पूर्व व पश्चिम या दोन्ही ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्री वाटप करण्यात आले. तसेच शालेय विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. त्यामध्ये स्कुल बॅग, कंपास पेटी, वॉटर बॉटल, वह्या - पुस्तके असे सर्व शैक्षणिक साहित्य देण्यात आले.

गेली ३५ वर्षे नियमित पणे हे साहित्य वाटपाचे काम केले जाते, सर्व वाळेकर परिवार, माजी नगरसेवक, सर्व महिला आघाडीच्या नेत्या व सर्व शिवसैनिक यांच्या सहकार्याने हा दोन दिवसांचा कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

कार्यक्रमाला विद्यार्थी, त्यांचे पालक, शिवसैनिक, पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, तसेच नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर आपली उपस्थिती दर्शविली. सदर कार्यक्रमाचे काम मोहन पोळ यांनी एक शिवसैनिक म्हणुन भुमिका पुर्ण केली.

## ६ दिवसांत पाडली ७३ बेकायदा बांधकामे...



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२५, ठाणे :** उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश आणि प्रभाग समितीच्या बीट निरीक्षकांनी केलेल्या पाहणीत आढळलेल्या बेकायदा बांधकामांवर पालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकामार्फत कारवाई करण्यात येत आहे. १९ ते २४ जूनपर्यंत एकूण ७३ बेकायदा बांधकामांवर कारवाई केली. त्यात पूर्ण इमारत, प्लिंथ, कॉलम, स्लॅब, वाढीव बांधकाम याप्रकारच्या बांधकामांचा समावेश आहे. यापुढेही बेकायदा बांधकामे पाडण्याची प्रभाग समितीनुसार कारवाई सुरूच राहणार आहे.

२१ आणि २३ जूनला झालेल्या कारवाईत ३० तर २४ जूनला १० अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली. या कारवाईमध्ये उपायुक्त (परिमंडळ), सर्व सहायक आयुक्त, अतिक्रमण आणि बांधकाम विभागांचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. पोलिस बंदोबस्तात कारवाई करण्यात आली.

**३३ बांधकामे जमीनदोस्त...**

ठाणे पालिका क्षेत्रात १९, २० जूनला झालेल्या कारवाईत एकूण ३३ बेकायदा बांधकामांवर कारवाई केली आहे. यावेळी पोकलेन, जेसीबी, गॅस कटर, ट्रॅक्टर ब्रेकर यांचा वापर करण्यात आला.

१) नौपाडा-कोपरी ६
२) वागळे ४
३) लोकमान्य सावरकरनगर ६
४) वर्तकनगर ५
५)माजिवडा मानपाडा १३
६) उथळसर ३
७) कळवा ६
८) मुंब्रा ७
९) दिवा २३
एकूण - ७३

## जिल्हाप्रमुख कुंदन पाटिल यांचा शहापूर तालुक्यात भगवा शिवबंधन अभियान सुरू



**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२५, शहापूर (ठाणे) :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख कुंदनजी पाटिल यांनी आज शहापूर तालुक्यातील जिल्हा परिषद गटानुसार भगवा शिवबंधन अभियान सुरू केला आहे. या दौऱ्यामध्ये सर्व शाखा प्रमुख व निष्ठावंत शिवसैनिकांच्या भेटी घेऊन मुक्त संवाद साधला तसेच सर्व शिवसैनीकांच्या मनगटाला शिवबंधनबंधण्यात आले.

या दौऱ्याची सुरुवात ठाणे ग्रामीणचे उपजिल्हाप्रमुख शंकरजी खाडे यांची भेट घेऊन केली. त्यानंतर मळेगाव जिल्हा परिषद गटातील शिलोत्तर, साठगाव, शेणवा, मळेगाव, कुडशेत, बेडीसगावं, मुगाव, अस्नोली, गेगाव, आल्याणी तर किन्हवली गटातील शेलवली, किन्हवली, शिवाजीनगर, मानेखिंड, खरीड, फोफोडी, कानवे, चेरवली, ढुणे तर सोगाव गणातील बर्डेपाडा, सोगाव, सावरोळी, या गावांना भेटी देऊन तेथील व आजूबाजूच्या गावांतील शाखाप्रमखांची व निष्ठावंत शिवसैनिकांची भेट घेऊन मुक्त संवाद साधण्यात आला.

या दौऱ्यामुळे शिवसैनिकांत नवचैतन्य संचारल्याचे जाणवत होते. अनेक शिवसैनिकांनी जिल्हा प्रमुखांना सांगितलं की आम्हाला काहीही नको फक्त एक आपुलकीची हाक हवी आहे. आज जे तुम्ही येऊन आम्हाला प्रोत्साहन दिले त्यामुळे आम्ही नक्कीच भविष्यातील निवडणुकीत तुम्हाला या शहापूर तालुक्यात मशाल फडकवू. आणि ही शिवसेनेची मशाल कायम तेवत ठेवू.

भगवा शिवबंधन अभियान या अभियानामध्ये खूप मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला अनेक निष्ठावंत शिवसैनिकांनी सहभाग नोंदवला. प्रत्येक गावातील ज्येष्ठ शिवसैनिक शाखाप्रमुख व शिवसेनेला मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणात या दौऱ्यात सहभागी झाला होता.

अनेक शाखा प्रमुखांनी, व शिवसैनिकांनी आपल्या समस्या या दौऱ्यामध्ये जिल्हा प्रमुखांनकडे व्यक्त केल्या. हा दौरा पाहिला असता शिवसेना संपली असे म्हणणाऱ्याना ही मोठी चपराक असल्याचे जाणवत होते. अनेक निष्ठावंत शिवसैनिकांनी या दौऱ्यात आपल्या भावना व्यक्त केल्या व जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख यांनी सर्व शाखा प्रमुख व शिवसैनिकांना मार्गदर्शन केले. सर्व शखाप्रमुखनी जिल्हा प्रमुखचे स्वागत फटाकयांच्या अतषबाजिने करून शाल व पुष्प गुच्छ देऊन केला. हा दौरा सकाळी १०.०० वाजता सुरु झाला होता तर रात्री १०.०० वाजेपर्यंत जिल्हा प्रमुख, व शहापुर तालुका कार्यकारिणी या दौऱ्यात होती.

हा भगवा शिवबंधन अभियान २४ मे ते २८ मे २०२५ असा ५ दिवस होणार आहे.

## तालुका विधी सेवा समिती गुहागर मार्फत कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर संपन्न



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२५, गुहागर :** तालुका विधी सेवा समिती गुहागर मार्फत न्य इग्लीश स्कुल व न्युनियर कॉलेज पाटपन्हाळे (गुहागर) येथे मंगळवार दिनांक २४ जून २०२५ रोजी एन.डी. पी.एस (N.D.P.S.ACT) या विषयावरती कायदे विषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करणेत आले होते.

सदर मार्गदर्शन शिबिराध्ये तालुका विधी सेवा समिती गुहागर अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी (वर्ग १ गुहागर) पी. व्ही.कपाडिया यांनी तसेच या शिबीरामध्ये वकिल सुशील अवेरे यांनी N.D.P.S.act वरती मार्गदर्शन केले. वकील सुशील अवेरे यांनी N..P.S. Act, या कायदे विषयी प्राथमिक माहिती दिली जसे कि, सदर कायदा हा १९८५ साली अमलात आला. यामध्ये बेल विषयक तरतुदी जामीन पात्र, अजामीन पात्र, होणारी शिक्षा, प्रकार व कायद्याची गरज इत्यादी माहिती सांगितली तर न्यायाधीश पी. व्ही.कपाडिया यांनी सदर कायद्यामध्ये असणारी प्रकरणे, कलमे, या कायद्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणा याविषयी माहिती देवून युवकांनी या पासून दूर राहून अभ्यासाकडे लक्ष्य देण्याचे संबोधित केले.

या शिबीरामध्ये पाटपन्हाळे हायस्कूलचे मुख्याध्यापिका संपदा चव्हाण, पर्यवेक्षक जी.डी.नेरले, प्रा. संजीव मोरे तसेच सर्व वकील न्यायालयीन कर्मचारी रामेश्वर शिंदे, निसार खेरटकर, पाष्टे, शिक्षक वृंद, तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ‘टोरंट हटाव’ आंदोलनासाठी ठाम भूमिका...

## खासदार पदाचे एक वर्ष पूर्ण केल्यानंतर पत्रकार परिषदेत कामांचा आढावा...



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२५, डोंबिवली :** खासदार पदाची जबाबदारी स्वीकारून एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आज आयोजित पत्रकार परिषदेत लोकसभा खासदार सुरेश म्हात्रे उर्फ (बाळ्या मामा) यांनी वर्षभरात केलेल्या कार्याचा सविस्तर आढावा सादर केला. यावेळी त्यांनी टोरंट हटाव या आंदोलनात्मक घोषणेबाबत आपली ठाम भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट करत जनतेच्या हक्कांसाठी लढण्याची आपली कटिबद्धता अधोरेखित केली.

निवडणूक प्रचारादरम्यान मी जनतेच्या हक्कांसाठी ‘टोरंट हटाव’ ही घोषणा दिली होती. हा मुद्दा मी केवळ प्रचारापुरता मर्यादित ठेवला नाही, तर लोकसभेत ठामपणे मांडला. या विषयावर आवाज उठवणारा मी एकमेव खासदार आहे, याचा मला अभिमान आहे, असे ते म्हणाले.

टोरंट कंपनीने मागील काही महिन्यांत ग्राहकांकडून घेत असलेल्या अतिरिक्त डिपॉझिटविरोधात खासदार सुरेश म्हात्रे यांनी तीव्र भूमिका घेतली होती. ही वसुली पूर्णतः बेकायदेशीर असून, याविरोधात मी आवाज उठवल्यानंतर कंपनीने डिपॉझिट मागणे थांबवले आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

सध्या त्यांच्या कार्यालयात जबरदस्तीने डिपॉझिट वसुलीबाबत एकही तक्रार प्राप्त झालेली नाही, हे समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले. यामुळे जनतेची एकजूट, लोकशाही मार्गाने उचललेली पावले आणि वेळेवर घेतलेले निर्णय प्रभावी ठरल्याचे स्पष्ट होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

‘टोरंट हटाव’ ही केवळ एक घोषणा नव्हती, तर जनतेच्या हक्कांसाठी घेतलेली शपथ होती. हा लढा इथे थांबणार नाही. तो अधिक ताकदीने पुढे नेला जाईल. लोकहितासाठी योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची माझी बांधिलकी कायम आहे, असा ठाम विश्वास खासदार यांनी व्यक्त केला.

या पत्रकार परिषदेला विविध माध्यमांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वर्षभरातील विविध विकासकामांचा, प्रश्नांवरील हस्तक्षेपाचा आणि संसदेत केलेल्या कामगिरीचा तपशीलही त्यांनी यावेळी मांडला.

# आ.मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून पाणी टंचाई होणार दूर

## आमदार निधीअंतर्गत १९ हातपंप बसविण्याकरीता ३४.३७ लाखांची प्रशासकीय मान्यता

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** पाणी म्हणजे जीवनाचा मूलभूत आधार... बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील गावागावांमध्ये नागरिकांची पाण्यासाठी सुरू असलेली वणवण अखेर थांबणार आहे. राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने मोठा दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे.



आमदार निधीतून ३४.३७ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळवून १९ ठिकाणी हातपंप बसविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे अनेक गावांतील पिण्याच्या पाण्याची समस्या दीर्घकाळासाठी सुटणार आहे. बल्लारपूर मतदारसंघातील २१ ठिकाणी हातपंप आणि सोलार पंप बसविण्याच्या कामांसाठी ७१.६२ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता यापूर्वीच मिळालेली होती आणि आता ३४.३७ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाल्याने मुल, बल्लारपूर, पोंभुर्णा आणि चंद्रपूर तालुक्यातील अनेक गावांमधील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे.

आमदार सुधीर मुनगंटीवार यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि ठोस पुढाकार यामुळे प्रशासकिय मान्यता मिळाली असून, ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. उन्हाच्या तीव्र तडाख्यामुळे वाढलेल्या पाण्याची गरज ओळखून, बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील विविध भागांमध्ये हातपंप आणि सोलार पंप बसवण्याची संकल्पना आ.मुनगंटीवार यांनी पुढे राबवली.

**हातपंप बसवण्याची कामे**

या मंजुरी अंतर्गत बल्लारपूर तालुक्यातील कवडजई येथे स्मशानभूमीजवळ, कवडजई हेटी, बल्लारपूर येथे सरदार पटेल वार्ड, पोंभुर्णा तालुक्यातील मौजा आष्टा येथे जि. प. शाळेजवळ, चकठाणेवासना येथे राजू उपासे यांचे घराजवळ, सातारा भोसले येथे हिराबाई कोडापे यांचे घराजवळ तर मुल तालुक्यातील कोंसबी येथे हनुमान मंदिराजवळ, चितेगाव, चिमढा, नवेगाव भुजाळा, नांदगाव, फिस्कुटी, भादुर्णी, मारोडा, राजोली आणि सुशी दाबगांव या ठिकाणी हातपंप बसविण्याची कामे करण्यात येणार आहेत.

या १९ कामांना एकुण ३४.३७ लाखांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

# अखेर प्रतिक्षा संपली; बिबी धरणात होणार पाणी साठा

## नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२५, पाटण (सातारा) :** गेली २० -२२ वर्षे रखडलेल्या बिबी धरणाची घळभरणी अखेर पूर्ण झाली असून धरणात पाणी कधी साठणार या प्रतिक्षेत असलेल्या बिबी धरणात अखेर चालू पावसाळी हंगामापासून पाणी साठा होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्यातसमाधानाचे वातावरण असून या धरणातील पाण्याचा फायदा बारमाही बिबी, सुरुल, पाटण, म्हावशी या गावांना होणार आहे. मात्र धरणात पाणी साठवण्याचे हे पहिलेच वर्ष असून बिबी, सुरुल, पाटण व केरा नदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. हे लघुपाटबंधारे धरण बिबी येथील येडोबा ओढ्यावर असून ओढयामध्ये पाण्याचा प्रवाह वाढल्यास पाण्यामध्ये जाण्यास नागरीक तसेच जनावरांना सक्त मनाई असल्याचा आदेश कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सातारा वरुण मोटे यांनी काढला आहे.


या आदेशात पुढे म्हणले आहे लघुपाटबंधारे तलाव बिबी, ता.पाटण, जि.सातारा या बांधकामामधील प्रकल्पास शासनाने दि. १०/०३/२०२५ रोजी प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर प्रकल्प बिबी येथील येडोबा ओढ्यावर आहे. प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा २.६०३ द.ल.घ.मी इतका आहे. सदर धरणाची लांबी ७२० मी. असून उंची २८.८३ मी. इतकी आहे.

सदर प्रकल्पामुळे पाटण तालुक्यातील बिबी, सुरुल, पाटण, म्हावशी या गावांतील एकुण ६७८ हे. क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतक-यांच्या जमिनीस बारमाही पाणी उपलब्ध होणार आहे. बिबी लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या घळभरणीचे काम पूर्ण झालेले आहे. चालू वर्षी धरणामध्ये प्रथमतः पाणीसाठा करणेचे नियोजन लघुपाटबंधारे विभागाने केले आहे. त्यामुळे धरणाच्या बुडित क्षेत्रातील मौजे सलतेवाडी व धरणाच्या अजू-बाजूकडील मौजे बिबी, सुरुल, पाटण व म्हावशी, या गावांतील नागरीकांना सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. ओढयामध्ये पाण्याचा प्रवाह वाढल्यास पाण्यामध्ये जाण्यास नागरीक तसेच जनावरांना सक्त मनाई आहे. तसेच कोणत्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती निदर्शनास आल्यास १) सागर साहेबराव खरात, सहाय्यक अभियंता श्रेणी-१, मध्यम प्रकल्प उपविभाग क्र.८. कराड. भ्रमरध्वनी क्रमांक:- ९९७५०६०८११, २) माने, ग्राम महसूल अधिकारी, मौजे बिबी, ता. पाटण, जि. सातारा क्रमांक- २०१२७२४१४८६३, ३) कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, सातारा यांच्याशी संपर्क साधण्यांत यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# लासलगाव प्रा.आ.कें.निमगाव वाकडा अंतर्गत हिवताप महिना साजरा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२५, विंचूर (नाशिक) :** प्राथमिक आरोग्य केंद्र निमगाव वाकडा अंतर्गत हिवताप प्रतिरोध महिन्यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन हिवताप व इतर किटकजन्य आजाराविषयी जनतेमध्ये जागृती निर्माण व्हावी. राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत हिवताप प्रतिरोध महिना १ जून ते ३० जून महिन्यात साजरा केला जातो. या अनुषंगाने हिवताप व इतर किटकजन्य आजाराविषयी जनतेमध्ये जागृती निर्माण व्हावी, यासाठी जनजागरण मोहिमेसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या जनजागरण मोहिमेमध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या सूचनानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र निमगाव वाकडा अंतर्गत सर्व सहा उपकेंद्र कार्यक्षेत्रातील १४ ग्रामपंचायत कार्यालयास भेटी देऊन मा. सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकारी यांना कीटकजन्य रोग प्रतिबंधक उपाय योजना करण्याबाबत माहिती माहिती देऊन उपाययोजना अमलात आणण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांना मदत करण्यासाठी आवाहन करण्यात आले. गाव पातळीवर हिवतापाची लक्षणे, उपचार व हिवताप प्रतिरोधाच्या विविध उपाय- योजनांची माहिती विविध माध्यमाद्वारे पोचविणे आवश्यक आहे. डास उत्पत्ती प्रतिबंध उपाय योजनांमध्ये सहभाग वाढविणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. यामध्ये जलद ताप रुग्ण सर्व्हेक्षण, डासोत्पत्ती स्थानांत गप्पीमासे सोडणे, ग्रामीण आरोग्य पोषाहार व स्वच्छता समितीची सभा, आशा बळकटीकरण, कंटेनर सर्व्हेक्षण, हस्त पत्रिका वाटप व एक दिवस कोरडा दिवस पाळणे या विषयी जनतेमध्ये जनजागृती निर्माण करणे चालू आहे. नागरिकांनी आप-आपल्या घरातील पाणीसाठे झाकून ठेवावेत. घरासमोरील नाल्या वाहत्या करणे, खिडक्यांना जाळी बसविणे, संडासच्या व्हॅट पाईपला




जाळी बसविणे, झोपताना ओडोमॉसचा वापर करावा. कुलर्समधील पाणी आठ दिवसाला स्वच्छ करावे, घरासमोर डबकी होऊ देऊ नये, नारळपाण्याच्या करवंट्या तसेच घरातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी, आपल्या जवळील परिसर स्वच्छ ठेवावा. घरातील कोणत्याही व्यक्तीस ताप आल्यास तत्काळ जवळच्या शासकीय रुग्णालयात तपासणीस आणावे.

आरोग्याबाबतची कोणतीही योजना जनतेच्या सक्रीय सहभागाशिवाय यशस्वी होऊ शकत नाही.

रुग्ण शोध मोहिम तसेच डासावर नियंत्रणासाठी जनतेचा सहभाग महत्वपूर्ण आहे. म्हणून जनतेनी सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने किटकजन्य कार्यक्रमास सहकार्य केल्यास डासापासून प्रसार होणाऱ्या आजारावर नियंत्रण होऊन सर्व जनतेला चांगल्या आरोग्याचा लाभ होऊ शकतो.असे आवाहन प्राथमिक आरोग्य केंद्र निमगाव वाकडा मा. वैद्यकीय अधिकारी डॉ. अविनाश पाटील यांनी केले. या मोहिमेला यशस्वी करण्यासाठी प्रा आ केंद्र निमगाव वाकडा येथील आरोग्य निरीक्षक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक,आशा स्वयंसेविका व इतर सर्व कर्मचारी कार्यरत आहेत.

# डोगरशेळकी ते गुडसूर रस्त्याची दयनीय अवस्था ; २ वर्षांपासून दुरुस्ती नाहीच

## वाहनधारकांचा जीव धोक्यात, प्रशासन गाढ झोपेत

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२५, उदगीर (लातूर) :** उदगीर गुडसुर पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून तयार झालेला डोगरशेळकि ते गुडसूर रस्ता सध्या पूर्णपणे उध्वस्त झालेला असून गेल्या २ वर्षांपासून या रस्त्याची कोणतीही देखभाल वा दुरुस्ती करण्यात आलेली नाही. परिणामी या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना रोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. खड्ड्यांचा सडा पडलेला हा रस्ता अपघातांचे 'हॉटस्पॉट' बनत चालला आहे.



या मार्गाचा वापर शाळकरी मुले, शेतकरी, रुग्ण आणि सर्वसामान्य नागरिक दररोज करत असून, खड्ड्यांमुळे अनेकजण जखमी होण्याच्या घटना घडत आहेत. दुर्दैव म्हणजे, या समस्येकडे स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायत, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी पूर्णपणे दुर्लक्ष करत आहेत. ग्रामस्थांनी अनेक वेळा निवेदने देऊन, तक्रारी करून या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली, मात्र अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी मात्र केवळ आश्वासनांची उधळण केली. रस्ता दुरुस्त होण्याऐवजी अधिकच खराब होत चालला आहे.पंतप्रधान ग्राम सडक योजनेचा हा दर्जा असेल तर लोकांनी नेमकं विश्वास ठेवायचा तरी कशावर? असा संतप्त सवाल गावकऱ्यांनी केला आहे. रोज अपघात, जखमा आणि तक्रारी... पण प्रशासन मात्र गाढ झोपलेलं आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया माधव टेपाले नागेश नवाडे डाऊळचे सुखदेव गुमंनरया स्थानिक तरुणांनी दिली आहे. गावकऱ्यांची मागणी आहे की संबंधित यंत्रणांनी तात्काळ जागं होऊन रस्त्याची डागडुजी आणि दुरुस्ती करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

# थोडक्यात

## पिठेवाडीचा धबधबा ठरतोय सुरक्षित पर्यटनाचा आनंद



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२५, पाटण (सातारा) :** पावसाळी हंगाम सुरु झाला आहे. जून महिन्यातच सह्याद्रीच्या डोंगरावर हिरवाई दाटून आली आहे. सर्वत्र निसर्ग फुलला आहे. धबधबे ओसंडून वाहत आहेत. पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी मनाची उत्सुकता वाढली आहे. या मणदुरे पिठेवाडीचा सुरक्षित धबधबा पाहण्यासाठी. या धबधब्याला निसर्गाचे वरदान तर आहेच आणि तारळे - पाटण रस्त्यावर मणदुरे पिठेवाडी येथे सुरक्षित धबधबा आहे. या धबधब्याच्या जवळ तिर्थक्षेत्र जळव जोतिबा, तिर्थक्षेत्र निवकणे आणि सर्वांचे आकर्षण जळव-मणदुरे खिंड तर मग पावसाळी पर्यटनाचा आनंद पिठेवाडीचा धबधबा..

सातारा जिल्ह्यात पाऊसाचा जोर वाढला आहे. नदी, नाले, ओढे तुडुंब भरून वाहत आहेत. जून महिन्यातच निसर्गाने सह्याद्रीच्या डोंगरावर हिरवाईची चादर पसरली आहे. सर्वत्र आल्हादायक. वातावरणाची निर्मिती झाली आहे. अशा वातावरणात अनेकांना पावसाळी पर्यटनाचा मोह आवरता येत नाही. कुठंतरी जाव. रिमझिमत्या पावसात निसर्गाच्या सान्निध्यात मनमुराद भिजाव.. पावसाळी पर्यटनाचा सुखद आनंद घ्यावा, पण जिल्हा प्रशासनाने व स्थानिक प्रशासनाने असुरक्षित ठिकाणी गर्दी होणाऱ्या ठिकाणी काळजी घेतली आहे पावसाळी पर्यटन ठिकाणे पाहण्यासारखी पाटणच्या खोऱ्यात पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी तारळे - पाटण रस्त्यावर मणदुरे पिठेवाडी येथे सुरक्षित धबधबा आहे. या धबधब्याच्या जवळ तिर्थक्षेत्र जळव जोतिबा, तिर्थक्षेत्र निवकणे आणि सर्वांचे आकर्षण जळव-मणदुरे खिंड आहे. तर मग जातायं ना पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी पिठेवाडीचा धबधबा...पाहण्यासाठी

## मांडवे खुर्द येथील रेशनकार्ड कॅम्पसाठी उस्फुर्त प्रतिसाद

### ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटात शासनाची प्रत्येक योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचावी त्यासाठी निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांच्या संकल्पनेतून निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने रेशनकार्ड व बांधकाम कामगार कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातील विविध गावांमध्ये आपली सेवा आपल्याच दारी हा अभिनव उपक्रम सुरू आहे. या उपक्रमासाठी सर्वसामान्य जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. आज मांडवे खुर्द, देसवडे परिसरातील ग्रामस्थांसाठी विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला होता. या आधीच्या खडकवाडी येथील कॅम्पसाठी देखील ग्रामस्थांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे.

या कॅम्पमध्ये आतापर्यंत २ हजारांहून अधिक लाभार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. तसेच या कॅम्पला अक्षरशः महिला, पुरूष तसेच ज्येष्ठ नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. कॅम्पसाठी स्वयंसेवक मदत करत आहेत. आपली सेवा आपल्या दारी या सेवेबद्दल ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करून बाळासाहेब खिलारी यांनी हा उपक्रम चालू केल्याबद्दल कौतुक केले आणि आभार मानले.

दरम्यान या कॅम्पमध्ये नवीन रेशनकार्ड काढणे, रेशनकार्ड ऑनलाईन करणे, आधार कार्ड अपडेट करणे, बांधकाम कामगार कार्ड काढणे, नवीन मतदार नाव नोंदणी करणे, विविध प्रकारचे दाखले, रेशनकार्ड वरील नाव कमी करणे व दुरूस्ती करणे आदि सेवा दिली जाणार आहे. मात्र यासाठी वारंवार तहसील कार्यालयात जाऊन उंबरठे झिजवावे लागतात. मात्र एका हेलपाट्यात काम होईल ही गॅरंटी देखील नसते. मात्र विनाकारण एक दिवस वाया जातो. मात्र बाळासाहेब खिलारी यांनी टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावात कॅम्प राबवून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच या कॅम्पमध्ये एकाच ठिकाणी सर्व कामे करून मिळणार आहे. दरम्यान मांडवे खुर्द येथील या कॅम्पवेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दिपक अण्णा लंके, माजी सरपंच सोमनाथ आहेर, बाजार समितीचे संचालक श्रीरंग रोकडे, सरपंच कमलताई गागरे, कैलास गागरे, तुकाराम जाधव, भाऊसाहेब गागरे यांच्यासह प्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी १५ जुलैपर्यंत अर्ज करावेत

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, ठाणे :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, मुंबई शहर-उपनगर जिल्ह्यात 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती' योजनेकरिता दि. १५ जुलै २०२५ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन महामंडळाच्या मुंबई शहर-उपनगर जिल्ह्याच्या जिल्हा व्यवस्थापक वैशाली मुडळे यांनी केले आहे. मुंबई शहर-उपनगर जिल्हयातील मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेतलेल्या व उत्तीर्ण झालेल्या इयत्ता १०वी, १२वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी इ. करिता महामंडळाकडून सरासरी ६०% पेक्षा जास्त गुण असलेल्या विद्यार्थ्यांकडून 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती' योजनेकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. अभ्यासक्रमामध्ये विशेष प्राविण्याने गुणवत्ता मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, रेशनकार्ड, आधार कार्ड, शाळेचा दाखला, मार्कशीट, दोन फोटो, पुढील वर्गात प्रवेश घेतल्याचा पुरावा इ. सह दोन प्रतींमध्ये आपले पूर्ण पत्यासह व भ्रमणध्वनी क्रमांकासह अर्ज साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, विकास महामंडळ (मर्या), मुंबई- गृहनिर्माणभवन, कलानगर, तळमजला, रुम नं. ३३, बांद्रा (पू), मुंबई-४०००५१ या पत्त्यावर दि. १५ जुलै, २०२५ पर्यंत करावेत, असे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.